स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 29–04–2017** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 2. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 21:–** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, **{उद्यान विभाग}** 1975 च्या कलम 18 अन्वये नागपूर महानगरपालिका सिमे अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या वार्षिक भाडयाच्या 1 प्रतिशत वृक्ष उपकर (Tree Cess) लावण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 22:–** नागपूर महानगरपालिकेतील वाहने/मशिनरी देखभाल व **{कारखाना विभाग}** दुरुस्ती अतंर्गत स्पेअर पार्ट खरेदी/दुरुस्तीचे व्दिवार्षीक दरकरार करण्यात आले असुन, सदर दरकरारास स्थायी समिती ठराव क्र. 140, दि. 02/05/2016 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. तसेच सदर दरकराराची मुदत दि. 09/08/2018 रोजी पर्यंत आहे. सदर

दरकरारातील दरसूची मध्ये अग्निशमन व आरोग्य विभागा अतंर्गत, नविन खरेदी झालेले वाहने/मशिनरीच्या सूटेभागाचे/साहित्याचे तसेच हॉट मिक्स प्लॉट मधिल यंत्र सामुग्री दुरुस्तीचे व लेबर चार्जेसचे काही दर समाविष्ट नाही.

त्यामुळे नविन वाहने/मशिनरी व संयत्रे यांची देखभाल/दुरुस्ती करीता लागणारे सूटेभाग/ साहित्य व दुरुस्ती खर्च समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने, सदर सूटेभाग व साहित्याकरीता निविदा मागवुन, दर निश्चित करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मनपाच्या आरोग्य विभाग, हॉट मिक्स प्लॉट विभाग तसेच अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागाच्या माताहत असलेल्या वाहने/मशिनरीच्या देखभाल/दुरुस्तीकरीता, आवश्यक असलेले जे सुटेभाग व लेबर चार्जेस, कार्यान्वित दरकरार मधील दरसूची मध्ये समाविष्ट नाहीत, त्यांचे सुध्दा दर, निविदा मागवून दरनिश्चित करण्याची आवश्यकता आहे. सदर दरकराराची मुदत वर उल्लेखित कार्यन्वित दरकराराच्या मुदतीपर्यत अंमलात राहिल.

करीता, मनपाच्या विविध विभागामध्ये नविन खरेदी करण्यात आलेले वाहने/मशिनरी साठी, सुटेभाग/साहित्य/लेबर चार्जेस व तसेच कार्यान्वित दरकरारमधील दरसूचीत समाविष्ट नसलेले सुटेभाग/साहित्य/लेबर चार्जेस इत्यादी करीता, ई–निविदा मागवून, दर निश्चिती करुन सद्यस्थितीत कार्यान्वित दरकरारमधिल दरसूचीमध्ये जोडण्याचा (Append) तसेच ई–निविदा अतंर्गत पात्र निविदाधारकास संबधित सुटेभाग/साहित्य/लेबर चार्जेसच्या पुरवठादारांच्या यादीत समाविष्ट करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 23</u>:–** स्वामी विवेकानंद स्मारक, अंबाझरी ओव्हरफ्लो पॉईंट
**{उद्यान विभाग}** येथील स्टोन वर्क, इलेक्ट्रिकल अप्लायन्सेस तसेच टि.व्ही., म्यूरल व इतर महागडे साहित्य व सौदर्यीकरणाची देखभाल व संचालनाकरिता पर्यटकाकडून प्रति व्यक्ती प्रवेश शुल्क रुपये 10/– आकारण्याचा व हा खर्च म.न.पा.तर्फे वसूल करण्याचा प्रश्न समितीने विचारात 3 वर्ष वयोगटाच्या वरील व्यक्तीस हे शुल्क लागु राहील या सुचनेसह विषयास समितीने यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 24</u>:–** शासन निर्णय क्र. नामपा – 2308 – 680 – प्र.क्र. – 358 –
**{जलप्रदाय विभाग}** नवि – 26, दि. 01.04.2009 व शासन निर्णय क्रमांक नामपा – 2308 – 680 – प्र.क्र. – 358 – नवि – 26 दिनांक 08.09.2010 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या क्रमशः नागपूर शहर पाणीपट्टी दर मुल्यांकन वसुली उपविधी 2009 व दुरूस्ती उपविधी 2010 च्या कलम 56(ब) अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत आयुक्त, म.न.पा. यांनी सोबत सहपत्र – 1 वर जोडलेल्या आदेश क्रमांक एम.सी./562/2017, दि. 30.03.2017 अन्वये मंजुर केलेले व दिनांक 01.04.2017 पासून लागू केलेल्या सुधारित दरांची माहीती स्थायी समीतीपुढे ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने नोंद घेतली.

**<u>ठराव क्रमांक 25</u>:–** जकातीच्या जप्तीच्या मालाची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने निविदा **{स्था. संस्था कर विभाग}** बोलावून विक्री करण्याबाबत.

जकात सुरु असतांना जकात विभागाव्दारे दैनंदीन कार्यवाही करीत असतांना आयातकर्त्याकडून जकात न भरता किंवा कमी जकात भरुन माल शहरात आयात होत असतांना भरारी पथकांव्दारे मालाची शहनीशा करण्याकरीता विविध प्रकारचा माल जप्त करण्यात येत होता. जप्त केलेला माल आयातकर्त्यांनी सोडवून न घेतल्याने या मालाची साठवूण जकात नाका वाडी, दाभा व हिंगणा नाका येथे करण्यात आलेली आहे. दि. ११.०५.२०१६ चे परिवहन समितीचे बैठकीतील निर्देशानुसार परिवहन विभागाला ग्रीन बस, स्टार बस संचालनाकरीता जागा द्यावायाच्या

असल्याने येथील गोडावून्स रिकामे करण्याचे निर्देशित आहे. तसेच आयातकर्ते त्यांचा माल सोडवून घेण्यास इच्छुक नसल्याने हया मालाची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने मालाचे अंदाजित मुल्यांकन आवेदन मागवून मे. एम.जी. चांडक, व्हॅल्युअर यांचे कडून करवून घेण्यात आले असून खालील प्रमाणे विवरण(Lot wise) व मुल्यांकन (offset value) काढण्यात आलेली आहे.

जकातीच्या जप्तीच्या विविध मालाचे व्हॅल्युअर यांनी केलेले मुल्यांकनाचा एकत्रित गोषवारा

| अ.क्र. | मालाचे विवरण | मुल्यांकन केलेली एकूण किंमत |
|---|---|---|
| १. | Sports Goods | 75300.00 |
| २. | Medical/surgical/scientific | 112042.00 |
| ३. | Maniyari | 275720.00 |
| ४. | General Goods/Cosmetics | 800795.00 |
| ५. | Electrical goods | 719193.00 |
| ६. | Electronic goods | 539695.00 |
| ७. | Kitchenware goods | 430525.00 |
| ८. | Ready-mades | 332990.00 |
| ९. | Industrial/Engineering | 185880.00 |
| १०. | Hardware/ Sanitary | 698480.00 |
| ११. | Motor/Auto Parts | 853666.00 |
| | Total | 5024286.00 |

वरील विवरणानुसार संपूर्ण माल ई-लिलाव(e-Auction) प्रक्रिया राबवून विक्री करण्याचे प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 26ः—** प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे विधी
**{अभियोजन विभाग}** विभागाने प्रायोगीक तत्वावर उच्च न्यायालयाकरीता मासीक मानधनाऐवजी प्रकरणा (केस) प्रमाणे वकिलांची देयके निश्चिती करण्याकरीता विस्तृत अध्यन करुन अहवाल तत्कालीन स्थायी समिती पुढे ठेवलेला होता व मा. स्थायी समितीने ठराव क्र. 153 दिनांक 27.08.2015 नुसार मान्यता प्रदान केली होती व उक्त ठराव दिनांक 01.09.2015 पासून कार्यान्वित करण्यात आलेला असून त्याचे परिणाम महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टिने अत्यंत चांगले व समाधानकारक आहेत करीता त्याच धर्तीवर जिल्हा व सत्र न्यायालयातील/कामगार व औद्योगीक न्यायालयातील/ग्राहक पंचायत व इतर न्यायायलयातील वकिलांच्या पॅनलवर असलेल्या वकिलांची सेवा मासीक मानधनाऐवजी प्रकरणानिहाय करण्याकरीता विस्तृत माहिती खालील प्रमाणे ठराव क्र. 15 दिनांक 17/04/2017 अनुषंगाने सादर प्रस्तूत..

नागपूर महानगरपालिकेच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील/कामगार व औद्योगीक न्यायालयातील/ग्राहक पंचायत व इतर न्यायायलयातील वकिलांच्या पॅनलवर एकूण 11 वकिलांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या मानधनाकरीता रु. 1,80,500/— दरमाह प्रमाणे वर्षाला एकूण रु. 21,66,000/— वर्षाचा खर्च होत आहे. दिनांक 31 डिसेंबर 2016 पर्यंत महानगरपालिकेचे एकुण 2951 प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित आहे.

प्रकरण प्रमाणे अधिवक्तांची देय राशी निश्चित करण्याकरीता प्रकरणाचा प्रकार व इतर बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे प्रकरण निहाय देय राशी निश्चिती करण्यास प्रशासनाने खालील दर निश्चित केले आहे.

| अनु. क्र. | न्यायालयाचे नांव | प्रकरण निहाय देयक (रु) |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय | | |
| 1 | किरकोळ अपिल (खालील कोर्टाच्या आदेशांविरुध्द अपिल) | 3000/– |
| 2. | किरकोळ अर्ज (डिले अर्ज व इतर) | 1500/– |
| 3. | म्युनिसिपल अपिल (टॅक्स प्रकरणे) | 5000/– |
| 4. | नियमित अपिल (नियमित दाव्यातील अंतिम आदेशाविरुध्द अपिल) | 10000/– |
| 5. | आर्बीट्रेशन अवार्ड विरुध्द अपिल | 10000/– |
| दिवाणी न्यायालय (कनिष्ठ व वरीष्ठ स्तर) | | |
| 6. | नियमित दावा / इलेक्शन पिटीषन / क्लेम पिटीशन इत्यादी | 10000/– |
| 7. | नियमित दावा जिथे मनपा नाममात्र पार्टी असेल | 3000/– |
| 8. | विशीष्ट नियमित दावे (अत्यंत महत्वपूर्ण दावे, सार्वजनिक हितसंबंधी दावे, रिकव्हरीचे दावे इत्यादी) ज्या दाव्यांना अभियोजन विभाग विशिष्ट दावा म्हणून प्रमाणित करेल असे दावे. | 20000/– |
| 9. | यु.एल.पी. कायदयाअंतर्गत तक्रार अर्ज | 7500/– |
| 10. | आय.डी.ए. कायदयांतर्गत अपिल | 7500/– |
| 11. | वर्कमन कंपनसेशन कायदयांतर्गत अर्ज | 7500/– |
| न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी | | |
| 12. | जन्माचा – मृत्युचा दाखला मिळण्याकरीता अर्ज | 300/– |
| | | |
| 13. | विविध कायदयांतर्गत दाखल करण्यात आलेले फौजदारी प्रकरणे | 5000/– |
| राज्य ग्राहक पंचायत | | |
| 14. | ग्राहक तक्रार | 2500/– |

महानगरपालिका सध्या परिस्थितीत दरवर्षी एकुण रु. 21,66,000/– इतका खर्च करण्यास बंधनकारक आहे पण प्रकरणनिहाय देयके देता आले तर दरवर्षी अंदाजे रु. 17,00,000/– इतका महत्तम खर्च होईल व दरवर्षी महानगरपालिकेचे अंदाजे रु. 4,00,000/– वाचतील. याबाबत विस्तृत माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

उपरोक्त न्यायालयांकरीता मासीक मानधनाऐवजी प्रकरणप्रमाणे देय राशी निश्चिती केल्यास उपरोक्त न्यायालयातील कामे जास्त सुव्यवस्थित पध्दतीने चालतील व म.न.पा. चा दरमहिन्याचा आर्थिक बोझा अगदी कमी होउन जाईल अशी प्रशासनाची धारणा आहे. करीता उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावास मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 27</u>:– महानगरपालीका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास **{कार्यकारी अभि. झोन 4}** योजने अंतर्गत प्रभाग क्र. 23 पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील पलांदुरकर सोसायटी सुखसागर सोसायटी, वेलकम सोसायटी आणि काकडे ले–आऊट येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव एकुण 04 अर्हता प्राप्त निविदांपैकी मे. ओ. जी. बजाज हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 1.00 टक्के कमी दराची रूपये 49,46,594/– ( रूपये चौ–यानऊ लक्ष छेचाळीस हजार पाचशे चौ–यानऊ रूपये फक्त ) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 28</u>:– **{शहर अभियंता}** रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहाचे उर्वरित स्थापत्य बांधकामाकरिता रू. २१,५५,३४,१७३/– रकमेचे सुधारित प्राकलनास मंजुरी प्रदान करणे तथा या कामाचे निम्नतम निविदाकार मे. सादीक ॲन्ड कंपनी यांना ५.६७ टक्के कमी या मंजूर दरावर उर्वरित रू. ५,८४,१७,९५७/– रकमेचा कार्यादिश देण्यास्तव तसेच हा खर्च पद क्र. ए४ ६८०१३७३६२३ मधून करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर